दैनिक पुढारी दि. ५ जुलै १९९२

# कमला कॉलेजला एम. ए. होमसायन्सची परवानगी

## विद्यापीठ अनुदान मंडळाकडून ९ लाख रु. विकासासाठी मंजूर : प्राचार्य पाटील यांची माहिती

कोल्हापूर, दि. ४ - दक्षिण महाराष्ट्रात प्रथमच्च एम. ए. होमसायन्सचे वर्ग सुरू करण्यास ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजला शासनाने परवानगी दिली असल्याची आणि विद्यापीठ अनुदान मंडळाने ८ व्या पंचवार्षिक योजनेसाठी या कॉलेजच्या विकासासाठी ९ लाख रुपये मंजूर केले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी पत्रकार बैठकीत दिली.

एम. ए. होमसायन्स होण्यासाठी दक्षिण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मुंबई, नागपूर, अमरावती किंवा औरंगाबाद याठिकाणी जावे लागत होते. आता ही सोय कमला कॉलेजमध्ये झाली आहे. कमला कॉलेजच्या शैक्षणिक सोयी, सुविधा व प्रगती पाहून अनुदान मंडळाने यंदा ९ लाख रुपये मंजूर केले आहेत. यापैकी ३ लाख ग्रंथालय इमारतीसाठी, १ लाख ५०हजार होंमसायन्स उपकरणे, १ लाख २५ हजार ग्रंथालयातील पुस्तकांसाठी व २५ हजार अन्य शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी खर्च केले जावयाचे आहेत. सहा लाख रुपये खर्च होणार असून उरलेले तीन लाख रुपये अनुदान मंडळाकडे जादा फंड उपलब्ध होताच मिळणार आहेत. असे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. या बैठकीस ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील उपस्थित होते.


ताराराणी विद्यापीठाचे

**कमला कॉलेज, कोल्हापूर**

# एम.ए.होमसायन्स

## प्रवेश सूचना

उत्कृष्ट निकालांची परंपरा असणाऱ्या आमच्या महाविद्यालयात एम.ए. होम सायन्स हा वर्ग सुरू करण्यास शिवाजी विद्यापीठाने मान्यता दिली असून दि. ६ जुलै १९९२ पासून विद्यार्थिनींना या वर्गात प्रवेश देण्याचे काम सुरू होत आहे.

* प्रवेश पात्रता : मान्यताप्राप्त विद्यापीठाची होम सायन्स विषयाची पदवी परीक्षा उत्तीर्ण. * प्रवेश मर्यादित. * प्रवेश अर्ज स्वीकारण्यंाची शेवटची तारीख : ११ जुलै १९९२. * प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी सविस्तर माहितीसाठी कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा.

डॉ. व्ही. टी. पाटील
संस्थापक-अध्यक्ष

डॉ. क्रांतीकुमार पाटील
प्राचार्य

*** निर्मातुं शिव सुंदरम् ***

Sampark